MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

■ वर्ष : १२ अंक : ५ पाने : १२ ■ ऑगस्ट-सप्टेंबर २०१८ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

*प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,*

आधुनिक जगात वीज आणि तिच्या पुरवठ्यातील सातत्याला किती महत्त्व आहे, हे आता कोणालाच सांगण्याची गरज नाही. वीजपुरवठा थोड्या वेळाकरिता जरी खंडित झाला तरी आपली सर्व कामे थांबतात आणि आपल्याला वीजपुरवठा चालू होण्याची वाट पाहत थांबावे लागते. भविष्यात विजेची ही गरज वाढतच जाणार आहे.

आपला वीजवापर अजूनही विकसित देशांपेक्षा खूपच कमी आहे. तो त्यांच्याइतकाच झाला पाहिजे, असे नाही; पण जे विजेपासून वंचित आहेत, ज्यांना विजेचा वापर करून उत्पादन-निर्मिती करायची आहे, आपले आयुष्य सुकर करून घ्यायचे आहे आणि जगाशी जोडून राहायचे आहे, त्यांना पुरेशी आणि अखंडित वीज मिळाली पाहिजे, यासाठी गेली काही वर्षे अतिशय मूलभूत काम सध्या आपल्या राज्यात सुरू आहे. त्याचे काही चांगले परिणाम गेले दोन-तीन वर्षे दिसू लागले असून, यापुढे त्यात आणखी सुधारणा होणार आहे.

> *ऐतिहासिक विजेची मागणी पारेषित करण्यास महापारेषण कंपनीला मोठे यश मिळाले आहे.*

वीजनिर्मितीत झालेली वाढ, वितरण जाळ्यातील सुधारणा, ऊर्जा बचत आणि संवर्धनाच्या विविध उपायांमुळे महापारेषण आणि महावितरण कंपनीला मोठेच यश मिळाले आहे. २६ मे २०१८ रोजी तर देशभरात एकूण १७०,१२१ मेगावॅट वीज मागणीची नोंद झाली. त्यात महाराष्ट्राचा विक्रमी २३,७४६ मेगावॅट इतका वाटा होता. ही मागणी महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक होती. दोन्ही कंपन्यांनी उत्तम समन्वय ठेवून आणि नियोजन करून ती पूर्ण करण्यात यश मिळविले आहे, ही सार्थ अभिमान बाळगावा अशी आनंदाची गोष्ट आहे. विशेषत: सर्व छोट्या गावांना वीजपुरवठा करण्याचे स्वप्न देशाने साकार केले असतानाच विजेच्या विक्रमी मागणीला महाराष्ट्र अतिशय उत्तम तयारीने आणि समर्थपणे सामोरा गेला आहे. गेले काही वर्षे वीजनिर्मिती आणि त्याचे वितरण यासाठी जे विशेष प्रयत्न करण्यात आले, त्याचे हे यश आहे.

सर्व जिल्ह्यांत महावितरण व महापारेषण यंत्रणेचे सातत्याने सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्यात येत आहे. तसेच या यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे तसेच नवे तंत्रज्ञान वापरून करण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्य किती मोठे आहे, याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. राज्याच्या वीजपुरवठ्यावर लक्ष ठेवणे आणि तो सुरळीत राहील, यासाठी पराकाष्ठा केली जाते आहे; पण त्यात नवे तंत्रज्ञान वापरून सुधारणा करणे गरजेचे होते. ती प्रक्रिया आता वेगवान झाली आहे.

महापारेषण कंपनीमध्ये पारदर्शकता व गतिमानता वाढवून उत्पादकतेत वाढ करण्याच्या उद्देशाने परिवर्तन प्रकल्प सुरू करण्यात आला. या अंतर्गत ईआरपी अर्थात Enterprise Resource Planning पद्धतीनुसार SAP तंत्रज्ञान वापरून आयबीएम या आंतरराष्ट्रीय कंपनीच्या मदतीने महापारेषण कंपनीने उच्चस्तरीय व्यवस्थापन मंडळ, विविध विभागांचे कर्मचारी व अधिकारी, नियामक प्राधिकरणे, संबंधित वित्तीय संस्था आणि पुरवठादार यांच्या उपयोगासाठी एक अद्ययावत संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सदर प्रणाली सन २०१२ पासून कार्यान्वित करण्यात आलेली असून www.mahatransco.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जळगाव जिल्ह्यात महापारेषण कंपनीच्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत नाशिक परिमंडळामार्फत उभारण्यात येणाऱ्या २२० के.व्ही. उपकेंद्र केकतनिंभोरा, ता. जामनेर, २२० के.व्ही. उपकेंद्र विरोदा ता. यावल, १३२ के.व्ही. उपकेंद्र कर्की ता. मुक्ताईनगर व १३२ के.व्ही. उपकेंद्र कोथळी ता. भडगावचे भूमिपूजन करण्यात आले. आता एका शेतकऱ्याला एक ट्रान्सफॉर्मर दिला जाईल. त्यासाठी शाश्वत वीज देण्यासाठीच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे.

सांघिक आणि सामाजिक उत्तरदायित्व धोरणांतर्गत विविध प्रकल्प राबविले आहेत. यामध्ये प्रामुख्याने नागपूर येथील कोराडीदेवी मंदिर ते सुरादेवी रेल्वेस्थानकांपर्यंत साधारणतः पाच किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर ८० एल.ई.डी. पथदिव्यांची उभारणी केली आहे. कोराडीतील प्रकल्पग्रस्त भागातील २७ गावांमध्ये ४६ ठिकाणी एल.ई.डी. हायमास्ट दिव्यांची उभारणी केली आहे. कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरातील गावांमध्ये जलशुध्दीकरण संयंत्रणाची (Water ATM) उभारणी केली आहे. न्यू इंग्लिश स्कूल, हंगे ता. पारनेर, जि. अहमदनगर येथे १२ संगणक संच, एक लेझर प्रिंटर



**पराग जैन नानोटिया** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

आणि एक प्रोजेक्टर स्क्रीन देऊन संगणक कक्षाची उभारणी केली आहे.

चालू वर्षात २०१८-२०१९ मध्ये एकूण १२ नवीन अति उच्च दाब उपकेंद्रे उभारणे प्रस्तावित आहेत. या उपकेंद्रांत व अस्तित्वात असलेल्या उपकेंद्रांत क्षमतावाढीव्दारे मिळून एकूण ५००० एम.व्ही.ए.ची भर स्थापित क्षमतेत करणे व एकूण १२५० सर्किट किलोमीटर अति उच्च दाब वाहिन्या उभारणे प्रस्तावित आहे. या सर्व कामांवर मिळून एकूण ११५३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यापैकी ऑगस्ट २०१८ अखेरपर्यंत दोन नवीन अति उच्च दाब उपकेंद्रे, ७२५ एम.व्ही.ए. स्थापित क्षमतेत वाढ व ३५१.४६ सर्किट किलोमीटर अति उच्च दाब वाहिन्या उभारणे ही उद्दिष्टे साध्य करण्यात आली आहेत.

महाराष्ट्रात होत असलेले औद्योगिकीकरण, देशातील सर्वाधिक शहरीकरण आणि शेतीच्या सिंचनासाठी विजेचा होत असलेला वापर यामुळे राज्य विजेच्या वापरात आघाडीवर आहे. महाराष्ट्राने देशात अनेक आघाड्यांवर बाजी मारली असून, विजेच्या उत्पादन आणि पुरवठ्यातही मागे नाही, हे महाराष्ट्राने दाखवून दिले आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- पराग जैन नानोटिया**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**कळवा :** महापारेषणच्या राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा येथे आयोजिलेल्या आढावा बैठकीत बोलताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, समोर उपस्थित अधिकारी.

## ■ सर्व्हर रूम व कंट्रोल रूमची पाहणी ■

# `महापारेषण`ने २०३० पर्यंतचे नियोजन करावे : ऊर्जामंत्री

■ *टीम महापारेषण, नागपूर*

भविष्यात राज्याचा व प्रामुख्याने मुंबईचा होणारा विकास लक्षात घेऊन महापारेषणने किमान २०३० पर्यंतचे पुढील नियोजन करावे व त्याबाबतचा आराखडा लवकरात-लवकर सादर करावा, असे निर्देश ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. महापारेषणच्या राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा येथे आयोजिलेल्या आढावा बैठकीत ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते.


सुरुवातीला ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्य भार प्रेषण केंद्राच्या सर्व्हर रूम व कंट्रोल रूमची पाहणी केली. यावेळी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना केल्या. त्यानंतर मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप यांनी महापारेषणच्या कामकाजाचे सादरीकरण केले. पारेषण केलेली वीज, आकस्मिक घटना, अंदाजपत्रक, वीजनिर्मितीचा आढावा, नियोजित प्रकल्प, महापारेषणची आंतरवाहिनी, मुंबई आयलॅंडिंग योजनेचे भारनियमन याबाबत सादरीकरण केले.



**कळवा :** महापारेषणच्या राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा येथील सर्व्हर रूमची पाहणी करताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे व महापारेषणचे अधिकारी.

ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ``राज्यास अखंड वीजपुरवठा करण्याच्या दृष्टीने वाढती विजेची मागणी लक्षात घेता महापारेषण अंतर्गत येणाऱ्या राज्य भार प्रेषण केंद्रांचे बळकटीकरण करण्यात येईल, याकरिता आवश्यक निधीची कमतरता पडू देणार नाही; पण, महापारेषणने जगातील सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञान वापरून राज्याची विजेची गरज पूर्ण करावी.`` सायबर हल्ल्याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी; तसेच राज्य भार प्रेषण केंद्रांतील त्रुटी दूर करण्याबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश दिले.

याप्रसंगी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे, संचालक (प्रणाली) डॉ. संजय कुलकर्णी, संचालक (महिला) श्रीमती पुष्पा चव्हाण, ऊर्जा विभागाचे उपसचिव श्री. भीमाशंकर मंता, मुख्य अभियंता श्री. श्रीराम भोपळे, श्री. श्रीकांत राजूरकर, श्री. आर. एल. गायकवाड, श्री. शशांक जेवळीकर, श्रीमती ज्योती चिमटे, श्री. मोतीसिंह चौहान, श्री. सतीश गहेरवार यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.



### *सांघिक सामाजिक उत्तरदायित्व*

कोराडीदेवी मंदिर ते सुरादेवी रेल्वेस्थानकापर्यंत
८० एल.ई.डी. पथदिवे.





**मुंबई :** महापारेषण कंपनी आणि आरईसीटीपीसीएल यांच्यात झालेल्या बैठकीप्रसंगी डॉ. पी. व्ही. रमेश, डॉ. शकील अहमद, देबजानी चक्रवर्ती, भूपेंदर गुप्ता, प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. अरविंद सिंह, 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, श्री. रवींद्र चव्हाण, श्री. गणपत मुंडे, श्री. विनायक साठे, विनिता श्रीवाणी.

■ धोरणात्मक चर्चेवर भर ■

# महापारेषण आणि आरईसीटीपीसीएलमध्ये विविध विषयांवर मंथन

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी आणि आरईसीटीपीसीएल यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारातील पुढील टप्प्यातील विषयांवर मुंबईमध्ये झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीमध्ये सकाळच्या सत्रात पुढील धोरणांबाबत सखोल चर्चा झाली. सायंकाळच्या सत्रात महापारेषण आणि आरईसीटीपीसीएल कंपनीची सद्यस्थिती, प्रावीण्यता व भविष्यातील वाटचालीबाबत वाणिज्य दूतावास यांच्यासमोर सादरीकरण करण्यात आले.


बैठकीला आरईसी कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. व्ही. रमेश, वरिष्ठ कार्यकारी संचालक डॉ. शकील अहमद, कार्यकारी संचालक देबजानी चक्रवर्ती, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी भूपेंदर गुप्ता, अतिरिक्त महाव्यवस्थापक संजय कुलश्रेष्ठ, श्री. रोहित सिंह उपस्थित होते. तर महाराष्ट्र शासनाकडून प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. अरविंद सिंह, 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे, संचालक (वित्त) श्री. विनायक साठे, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. सुनीलदत्त शर्मा, कार्यकारी अभियंता तथा अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) (प्रभारी) श्री. योगेश पाचपांडे, सहाय्यक अभियंता अजित कोळेकर, श्रध्दा वर्डीकर उपस्थित होते. सूत्रसंचालन 'महापारेषण'च्या कंपनी सचिव वि  निता श्रीवाणी यांनी केले. शिष्टाचार अधिकारी श्री. सतीश जाधव व त्यांच्या टीमने पाहुण्यांची व्यवस्था चोख ठेवली.



**मुंबई :** महापारेषण कंपनी आणि आरईसीटीपीसीएल यांच्यात झालेल्या बैठकीप्रसंगी डावीकडून प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. अरविंद सिंह, होल्डिंग कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक, डॉ. पी. व्ही. रमेश, ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, देबजानी चक्रवर्ती.

### ऊर्जामंत्र्यांची भेट

महाराष्ट्राचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे व होल्डिंग कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक सायंकाळच्या सत्रात बैठकीला उपस्थित होते.



## *सांघिक सामाजिक उत्तरदायित्व*

कोराडीतील प्रकल्पग्रस्त २७ गावांमध्ये
४६ ठिकाणी एल.ई.डी. पथदिवे.





**मुंबई :** महापारेषण कंपनीने ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाशी सामंजस्य करार केला. त्याप्रसंगी 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, डॉ. शकील अहमद, संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, श्री. भूपेंदर गुप्ता.

### ■ पायाभूत सुविधा उभारणार ■

# ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाशी 'महापारेषण'चा सामंजस्य करार

■ *टीम महापारेषण, मुंबई*

राज्यातील वीज ग्राहकांना अखंडित, खात्रीशीर व किफायती वीज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्प उभारण्यासाठी महापारेषण कंपनीने ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ यांच्याशी परस्पर सामंजस्य करार केला आहे.

परस्पर पूरक समन्वय साधणे, देश तसेच विदेशामधील वीज क्षेत्रातील (पारंपरिक तसेच अपारंपरिक) प्रकल्प विकास, वित्तीय पुरवठा व प्रकल्प व्यवस्थापन तथा अंमलबजावणी याची संयुक्त पाहणी करणे, वीज क्षेत्रातील नवीन व्यावसायिक संधीसाठी व्यवसायाशी निगडित इतर पैलू तसेच इतर परस्पर सहमतीच्या उपक्रमांमध्ये एकमेकांना सहकार्य करण्याबाबत दोन्ही पक्षांमध्ये करार करण्यात आला.

वीज क्षेत्रातील प्रकल्प शोध व विकास, प्रकल्प व्यवस्थापन व अंमलबजावणी, पायाभूत सुविधांसाठी वित्तपुरवठा, सामाईक फायद्याच्या क्षेत्रांत तसेच वीज क्षेत्रातील देश व परदेशातील नवीन व्यावसायिक संधीबाबत परस्पर सहयोग करण्याबाबत देश व परदेशात परस्पर सहकार्य करण्यात येईल.

# 'महानिर्मिती'च्या कोराडी तलाव संवर्धनास मान्यता

■ *टीम महापारेषण, मुंबई*

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून जलपरिसंस्थेच्या संवर्धन आणि व्यवस्थापनासाठी राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय योजनेंतर्गत (National Plan for Conservation of Aquatic Eco-systems-NPCA) नागपूरजवळील महानिर्मितीच्या (महाजेनको) कोराडी तलावाचे संवर्धन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. शहरी व निमशहरी भागातील तलावांच्या संवर्धनासह प्रदूषित तलावांचे व्यवस्थापन करणे हा या योजनेचा मूळ उद्देश आहे.

तलावांचे शाश्वत व्यवस्थापन व संवर्धन करण्यास राज्य शासनास प्रोत्साहित व मदत करण्याच्या उद्देशाने केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या खर्चात केंद्रीय पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन मंत्रालय आणि महानिर्मितीचा वाटा ६०:४० असा राहणार आहे. या योजनेत तलावांचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना, सांडपाणी व्यवस्थापन, तलावांचे योग्य व्यवस्थापन, तलावांच्या परिसरात वृक्षारोपण, बांध मजबुतीकरण, तलावाच्या प्रथमदर्शनी भागासह सार्वजनिक जागांचा विकास, जलजागृतीसाठी उपक्रमांचे आयोजन आदींचा समावेश आहे.

या योजनेंतर्गत एकूण २६ कोटी २१ लाखांचा भार केंद्र सरकार उचलणार आहे. त्यापैकी ८ कोटी ७४ लाख ३९ हजार ६०० रुपयांचा पहिला हप्ता राज्यास वितरित केला आहे. तसेच महानिर्मिती कंपनीच्या १७ कोटी ४८ लाख रुपयांच्या हिश्श्यातील तीन कोटी ४९ लाख ७५ हजार ८४० रुपयांचा पहिला हप्ता वितरित करण्यासही मान्यता देण्यात आली.



***सांघिक सामाजिक उत्तरदायित्व***

कोराडी परिसरातील गावांमध्ये जलशुद्धीकरण संयंत्राची उभारणी.





**मुंबई :** पत्रकार परिषदेत बोलताना वीज नियामक आयोगाचे अध्यक्ष श्री. आनंद कुलकर्णी. शेजारी आयोगाचे सदस्य श्री. आय. एम. बोहरी, श्री. मुकेश खुल्लर.

## ■ १ सप्टेंबरपासून नवीन दर लागू ■

# महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचे सुधारित दर जाहीर

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने २०१८-२०२० या कालावधीतील राज्यातील घरगुती, कृषी व औद्योगिक विजेचे नवीन दर जाहीर केले आहेत. हे दर १ सप्टेंबर २०१८ पासून लागू झाल्याची माहिती वीज नियामक आयोगाचे अध्यक्ष श्री. आनंद कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

वीज नियामक आयोगाच्या कार्यालयात आयोजिलेल्या पत्रकार परिषदेस आयोगाचे सदस्य श्री. आय. एम. बोहरी, श्री. मुकेश खुल्लर, सदस्य सचिव श्री. अभिजित देशपांडे आदी उपस्थित होते.

सन २०१८-२०१९ साठी दक्षिण मुंबईतील बेस्टच्या विजेचे दर ६ ते ८ टक्क्यांनी कमी करण्यात आले आहेत. तर उत्तर मुंबईतील अदानी इलेक्ट्रिसिटी व टाटा पॉवरच्या विजेच्या दरात शून्य ते १ टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कृषी क्षेत्राचे वीजदर ३ रुपये ३५ पैशांवरून ३ रुपये ५५ पैसे प्रति युनिट असे करण्यात आले आहेत. तर घरगुती वीज ग्राहकांचे शून्य ते १०० युनिटसाठी ५ रु. ०७ पैशावरून ५ रु. ३१ पैसे तर १०१ ते ३०० युनिटसाठी ८.७४ रु. वरून ८.९५ रुपये प्रति युनिट असा नवीन दर जाहीर करण्यात आला आहे.

### इलेक्ट्रिक वाहन वापरासाठी प्रोत्साहन

इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी वीज वापरामध्ये अनुदानित दर ठेवण्यात आले आहेत. इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग स्टेशनसाठी प्रति युनिट सहा रुपये दर ठरविण्यात आला असून, स्थिर आकार (डिमांड चार्जेस) ७० रुपये प्रति केव्हीए/महिना असा ठरविण्यात आल्याचेही श्री आनंद कुलकर्णी यांनी या वेळी सांगितले.

### उच्च दाब वीज वितरणातील मोठे औद्योगिक ग्राहकांसाठीचे दर खालीलप्रमाणे

| कंपन्या | जुने दर (प्रति युनिट) | नवीन दर (प्रति युनिट) |
|---|---|---|
| टाटा पॉवर | रु. ९.१२ पैसे | रु. ९.३८ पैसे |
| अदानी इलेक्ट्रिसिटी | रु. १०.०७ पैसे | रु. ९ ३७ पैसे |
| बेस्ट | रु. ८.६५ पैसे | रु. ८.०६ पैसे |
| महावितरण | रु. ८.०४ पैसे | रु. ८.२० पैसे |

### उच्च दाब वितरण (वाणिज्यिक वापर)

| कंपन्या | जुने दर (प्रति युनिट) | नवीन दर (प्रति युनिट) |
|---|---|---|
| टाटा पॉवर | रु. ९.७१ पै. | रु. ९.९० पै. |
| अदानी | रु.१०.७६ पै. | रु. १०.०५ पै. |
| बेस्ट | रु. ९.१७ पै. | रु. ८.५६ पै. |
| महावितरण | रु. १३.४७ पै. | रु. १३.८० पै. |

### लघुदाब वितरण (छोटे उद्योगांसाठी)

| कंपन्या | जुने दर (प्रति युनिट) | नवीन दर (प्रति युनिट) |
|---|---|---|
| टाटा पॉवर | रु. ८.३४ पै. | रु. ८.१९ पै. |
| अदानी | रु. ९.३७ पै. | रु. ९.३७ पै. |
| बेस्ट | रु. ८.४३ पै. | रु. ७.५२ पै. |
| महावितरण | रु. ७.८३ पै. | रु. ८.२५ पै. |

### `महापारेषण`चे अभिनंदन!

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मुंबईतील प्रेस क्लबमध्ये आयोजिलेल्या पत्रकार परिषदेत आयोगाचे सदस्य श्री. मुकेश खुल्लर यांनी पारेषण हानी कमी केल्याबद्दल `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांचे विशेष अभिनंदन केले.

### वीज दरवाढ अत्यल्प : ऊर्जामंत्री



महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने वीज दरवाढीला मान्यता दिली असली तरी महावितरणने केलेली सुमारे ३४ हजार ६४६ कोटी रुपयांची मागणी अमान्य केली आहे. २०१८-२०१९ आणि २०१९-२०२० या कालावधीसाठी २० हजार ६५१ कोटी रुपयांच्या दरवाढीची मागणी मान्य केली आहे. त्यामुळे २०१८-२०१९ चा विचार केल्यास ही दरवाढ ३ ते ५ टक्के, तर २०१९-२०२० मध्ये ही दरवाढ ४ ते ६ टक्के असणार आहे. राष्ट्रीय महागाई निर्देशांकाचा विचार केल्यास ही दरवाढ अत्यल्प असून ती समर्थनीय असल्याची माहिती राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### गतिशील पद्धतीने प्रकरणांची सुनावणी

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या नवीन सदस्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आयोगासमोर येणाऱ्या प्रकरणांवरील सुनावण्या वेगाने करण्यावर भर दिला आहे. १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत १६० प्रकरणांवर आयोगाने निर्णय दिला असून, प्रति महिन्याला १३ प्रकरणे निकाली काढली आहेत, तर १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ या कालावधीत प्रति महिन्याला १७ याप्रमाणे २०४ प्रकरणे निकाली काढली आहेत, तर १ एप्रिल २०१८ ते १२ सप्टेंबर २०१८ या कालावधीत प्रति महिन्याला ३३ याप्रमाणे १६५ प्रकरणे निकाली काढली आहेत. पुढील काळात प्रत्येक महिन्याला ४० पेक्षा अधिक प्रकरणे निकाली काढण्यावर भर देण्यात येणार असल्याचेही श्री. कुलकर्णी, श्री. बोहरी व श्री. खुल्लर यांनी या वेळी सांगितले.



**मुंबई :** पत्रकार परिषदेत माहिती देताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे. शेजारी प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. अरविंद सिंह.

## ■ ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती ■

# राज्यात सात हजार अटल सौर कृषी पंपांसाठी शासनाची मान्यता

■ *टीम महापारेषण, मुंबई*

- लाभार्थींना ३ व ५ एचपीचे पंप मिळणार
- २२.५ टक्के अनु. जाती/जमातीसाठी राखीव
- केवळ ५ टक्के हिस्सा लाभार्थीला द्यावा लागणार
- १ लाख सौर कृषी पंपासाठी नवीन योजना साकारणार

राज्यात दिवसेंदिवस वाढत असलेली विजेची मागणी लक्षात घेता वीजनिर्मितीचे पर्यायी, शाश्वत स्रोत निर्माण करणे व नैसर्गिक स्रोतांपासून वीजनिर्मिती करणे आवश्यक झाले आहे. पारंपरिक वीज वापरात बचत करणे, हे लक्षात घेऊनच राज्यात अटल सौर कृषी पंप योजनेअंतर्गत ७ हजार सौर कृषी पंप वाटपास मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. ही योजना २३९.९२५ कोटी रुपयांची आहे, अशी माहिती ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याशिवाय राज्य शासनाद्वारे राज्यात १ लक्ष सौर कृषी पंप आस्थापित करण्याकरिता नवीन योजना तयार करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. अनुसूचित जाती/जमाती लाभार्थींकरिता विशेष योजना तसेच आदिवासी उपाययोजनेअंतर्गत निधीमधून वापर करून सौर कृषी पंप योजना तयार करण्यास मंजुरी देण्यात आली. हे ७ हजार सौर कृषी पंप आस्थापित झाले तर १४ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊ शकेल.

सौर कृषी पंप या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य होईल. ही संपूर्ण योजना महाऊर्जाकडून राबविण्यात येईल. लाभार्थीला आपला अर्ज महाऊर्जा कार्यालयात जमा करायचा आहे.

या योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या सौर कृषी पंपांपैकी २५ टक्के म्हणजे १ हजार ७५० पंप हे ३ अश्वशक्तीचे तर ७५ टक्के म्हणजे ५२ हजार ५०५ पंप हे अश्वशक्तीचे असतील. ३ व ५ अश्वशक्ती पंपांच्या एकूण उद्दिष्टांपैकी २२.५ टक्के पंप अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखीव राहणार आहेत. ३ एचपीच्या पंपाची केंद्र शासनाने निश्चित केलेली किंमत १ लाख ४० हजार तर ५ एचपीच्या पंपाची किंमत ३ लाख २५ हजार आहे. या योजनेत ५ टक्के हिस्सा लाभार्थीला भरावा लागणार आहे. ९५ टक्के निधी केंद्र आणि राज्य शासनाचा राहील. कृषी पंपाचा हमी कालावधी ५ वर्षांचा व सोलर मोड्युल्सची हमी १० वर्षांची असेल. कृषी पंप पुरवठाधारकावर ५ वर्षासाठी सर्वंकष देखभाल व दुरूस्ती करार करण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे.



## *सांघिक सामाजिक उत्तरदायित्व*

खसाळा, ता. कामटी या गावात भूमिगत गटाराचे बांधकाम पूर्णत्वाकडे.






**नाशिक :** महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेच्या वतीने आयोजिलेल्या राज्यस्तरीय मेळाव्याचे उदघाटन करताना `महापारेषण` चे संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे, शेजारी संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, मुख्य महाव्यवस्थापक तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, संघटनेचे अध्यक्ष कॉ. मोहन शर्मा, सरचिटणीस कॉ. कृष्णा भोयर, (मुंबई) सौ. ज्योती नटराजन.

## ■ महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन ■

# महापारेषण कंपनीतील कामगारांचा राज्यस्तरीय मेळावा

■ *टीम महापारेषण, नाशिक*

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेच्या वतीने महापारेषण कंपनीतील कामगार, अभियंते व अधिकारी यांचा राज्यस्तरीय मेळावा नाशिकमध्ये घेण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष कॉ. मोहन शर्मा (नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली तर सरचिटणीस कॉ. कृष्णा भोयर (मुंबई) यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा झाला.

संमेलनाचे उदघाटक म्हणून महापारेषण कंपनीचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण व संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे उपस्थित होते. संमेलनास महापारेषण कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, आयटक नेते श्री. व्ही.डी. धनवटे, संघटनेच्या उपाध्यक्षा सौ. जोती नटराजन, उपसरचिटणीस कॉ. अरुण मस्के, कॉ. एस. आर. खतीब, संयुक्त सचिव कॉ. भीमाशकंर पोहेकर, कॉ. जी. एस. वाघ व फेडरेशन कंत्राटी आऊट-सोर्सिंग कामगार अध्यक्ष कॉ. नंदकिशोर भड उपस्थित होते. सुरुवातीला नाशिक झोनचे झोनल सचिव कॉ. रोहिदास पवार यांनी प्रास्ताविक केले. संघटनेचे सरचिटणीस कॉ. कृष्णा भोयर यांनी संघटनेचा ५८ वर्षांचा इतिहास सांगून वीज उद्योगाचा ६० वर्षांचा प्रगतीचा व बदलाचा इतिहास सांगितला. श्री. अनंत पाटील यांनी कामगार संघटना व व्यवस्थापन यांच्या संबंधावर प्रकाश टाकला व फेडरेशन संघटना ही वीज उद्योगाचा विचार करणारी संघटना आहे, असे सांगितले.



**नाशिक :** मेळाव्याला उपस्थित कंपनीतील कामगार, अभियंते व अधिकारी.


श्री. सुगत गमरे म्हणाले, ``प्रशासनाने पारेषण कंपनीचा आकृतीबंध तयार केला आहे. त्यास महापारेषण कंपनी बोर्डाची मान्यता मिळालेली आहे. लवकरच तो प्रश्न मार्गी लागणार आहे.`` श्री. रवींद्र चव्हाण म्हणाले, ``महाराष्ट्रात आठ पारेषण कंपन्या तयार झाल्या आहेत, त्यांच्याशी महापारेषण कंपनीला स्पर्धा करावी लागणार आहे. संघटनेची भूमिका चांगली आहे. वीज कामगार यांच्या हिताचा विचार करताना प्रथम उद्योगाचा विचार करता म्हणून व्यवस्थापनसुध्दा आपल्या संघटनेचा शब्द प्रमाण मानत असते.``

अध्यक्षीय भाषण करताना संघटनेचे अध्यक्ष कॉ. मोहन शर्मा म्हणाले, `` वीजउद्योग जिवंत ठेवण्यासाठी वीज कामगार यांनी मैदानात लढले पाहिजे. पगार, बोनस, भत्ते याकरिता आपण लढत असतो हे प्रश्न नेहमीचेच आहेत. मात्र, उद्योग वाचविण्यासाठी लढा दिला पाहिजे.`` मेळाव्यास राज्यातील कामगार, अभियंते व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळाव्याचे आभार कॉ. नंदकिशोर भड यांनी मानले.



## *सांघिक सामाजिक उत्तरदायित्व*

औरंगाबादच्या एकतुनी गावापासून
उपकेंद्रापर्यंतच्या रस्त्यांचे बांधकाम.



■ सांघिक सामाजिक जबाबदारी ■

# कॅनकिडस-किडसकॅन संस्थेस धनादेश प्रदान

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महापारेषण कंपनीच्या सांघिक सामाजिक जबाबदारी फंडातून कर्करोगग्रस्त लहान मुलांसाठी काम करणाऱ्या कॅनकिडस-किडसकॅन या संस्थेस मुलांच्या औषधोपचारासाठी मदत म्हणून १९ लाख २६ हजार ९२७ रुपयांचा धनादेश प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. अरविंद सिंह व 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कॅनकिडस-किडसकॅन या संस्थेचे उपाध्यक्ष श्री. मुकुल मरवा यांना हा धनादेश प्रदान करण्यात आला. याप्रसंगी 'महापारेषण'चे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, कंपनी सचिव श्रीमती विनिता श्रीवाणी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील उपस्थित होते.



**मंत्रालय :** 'महापारेषण'च्या सांघिक सामाजिक जबाबदारी फंडातून कॅनकिडस-किडसकॅन या संस्थेस धनादेश प्रदान करताना प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. अरविंद सिंह व 'महापारेषण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, कंपनी सचिव श्रीमती विनिता श्रीवाणी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील.

■ स्वच्छ भारत, स्वस्थ भारत ■

# महात्मा गांधी जयंतीदिनी लांबोटीत स्वच्छता अभियान


■ *टीम महापारेषण, सोलापूर*

अति उच्च दाब मंडळ, सोलापूर कार्यालयाच्या वतीने महात्मा गांधी जयंतीनिमित्त लांबोटी येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात २२० के.व्ही. यार्डातील सुमारे पाच एकरांमधील गवत व कचरा काढण्यात आला.

अउदा संवसु मंडळ, सोलापूरचे अधीक्षक अभियंता श्री. अरुण वाघमारे यांनी या स्वच्छता अभियानाचे आयोजन केले होते. कार्यकारी अभियंता श्री. एच. यू. जाधवर, चाचणी विभागातील कार्यकारी अभियंता श्री. आर. टी. शेळके व मंडळ कार्यालयातील व्यवस्थापक श्री. रामचंद्र कानडे, श्री. ईश्वर गिडवीर यांनी परिश्रम घेतले. या स्वच्छता अभियानात अभियंते, अधिकारी, तांत्रिक कर्मचारी, मानव संसाधन, वित्त व लेखा विभागातील कर्मचारी व महिला यांच्यासह सुमारे १३० अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपला सहभाग नोंदविला.



**लांबोटी (सोलापूर) :** महात्मा गांधी जयंतीनिमित्त अउदा मंडळ, सोलापूर कार्यालयाच्या वतीने लांबोटी येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



## *सांघिक सामाजिक उत्तरदायित्व*

*न्यू इंग्लिश स्कूल, हंगे, जि. अहमदनगर येथे १२ संगणक संच.*



# `महापारेषण`मध्ये ७२ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई*

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे देशाचा ७२ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच `महापारेषण`च्या सात परिमंडळ कार्यालयांमध्येही स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले.

प्रकाशगंगा येथील मुख्यालयात `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांनी ध्वजारोहण केले. या वेळी `महापारेषण`चे संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) गणपत मुंडे, संचालक (वित्त) विनायक साठे, महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) सुगत गमरे, मुख्य अभियंता (संवसु) श्री. श्रीकांत राजूरकर, महाव्यवस्थापक (मा.सं., मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे, मुख्य सुरक्षा अधिकारी संजय कुमार, शिष्टाचार अधिकारी सतीश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) संदीप धाबर्डे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.











**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** `महापारेषण`चे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया.



## *सांघिक सामाजिक उत्तरदायित्व*

*उप्पलवाडी नाका ते उपकेंद्रापर्यंत रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम.*



■ पुरेशा दाबाने वीजपुरवठा होणार ■

# शहादा येथे २२०/१३२ के.व्ही. ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित

■ *टीम महापारेषण, नंदुरबार*

२२० के.व्ही.उपकेंद्र शहादा जिल्हा नंदुरबार येथे नवीन २२०/१३२ के.व्ही.१०० एम.व्ही.ए. ट्रान्सफॉर्मर नं.२ सुरळीतपणे कार्यान्वित करण्यात आला. यामुळे शहादा तालुक्यातील गावांना योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे.

शहादा उपकेंद्र येथे यापूर्वी १०० एम.व्ही.ए. चा फक्त एकच आयसीटी व १३२ के.व्ही. दोंडाइची लाईन यावर उपकेंद्राचा भार असल्याने वारंवार अतिरिक्त भारनियमनाचा प्रश्न होता. त्यामुळे मुख्य अभियंता श्री. जयंत विके, अधीक्षक अभियंता श्री. जगन्नाथ चुडे, कार्यकारी अभियंता, धुळेचे श्री. धनंजय आष्टीकर यांनी सतत पाठपुरावा व मार्गदर्शन केले. ३३ के.व्ही.चे फक्त दोन ट्रान्स्फॉर्मर होते. परंतु, वाढत्या वीज मागणीचा विचार करून हा नवीन ट्रान्स्फॉर्मर बसविण्यात आला. टेस्टिंग टीम, एजन्सी व उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेऊन तात्काळ ट्रान्स्फॉर्मर कार्यान्वित केला.

या कामासाठी भुसावळचे सर्वश्री जगन्नाथ चुडे, कार्यकारी अभियंता धुळेचे आष्टीकर, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) लोखंडे, मुंडे, खोंडे, भूषण पाटील, नवनाथ ठुबे, आंबाडकर, शरद माळी, सचिन पाटील, बाविस्कर, मस्कावद, पाटीदार, दीपक पाटील, सागर गुप्ता, प्रकाश राठोड, नितीन गावीत यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



■ महिला सक्षमीकरणासाठी `महापारेषण`चा पुढाकार ■

# पडघे येथे तीन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषण कंपनीच्या प्रशिक्षण धोरणांतर्गत महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने `शक्ती` हे तीन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर पडघे येथे घेण्यात आले.

प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री, सहाय्यक महाव्यवस्थापक डॉ. शीतल गेडाम, प्रशिक्षण समन्वयक श्री. सुनील शेनावा यांनी परिश्रम घेतले. `महापारेषण`चे महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे हे सांगता समारंभाला उपस्थित होते.



# 'महापारेषण'च्या अभियंत्यांचे भाईंदर येथे संमेलन

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

'महापारेषण'च्या संचलन व सुव्यवस्था विभागातील अभियंत्यांचे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, भाईंदर येथे संमेलन घेण्यात आले.

महापारेषण कंपनीच्या मुख्य कार्यालय व क्षेत्रीय कार्यालये यांच्यातील समन्वयात वाढ करणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमास मुख्य कार्यालय व नागपूर तथा अमरावती परिमंडळातील सहाय्यक अभियंता ते कार्यकारी अभियंता या दर्जाचे अधिकारी उपस्थित होते. मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांनी या कार्यक्रमाचा उद्देश सांगितला.

महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे यांनी उपस्थितांना कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागचा उद्देश सांगितला. प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रमुख संचालक (संचलन) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मुख्य अभियंता श्री. एस.एस.राजूरकर, श्री. एस.एस.जेवळीकर, श्री. एस. एन. भोपळे, अधीक्षक अभियंता श्री. एस. एस. काळे, श्री. नासीर एस. कादरी, श्री. व्ही. डी. पांडे, श्री. एम. एल. गुट्टे यांनी उपस्थितांशी आपले अनुभवकथन केले.



**भाईंदर :** 'महापारेषण'चे वरिष्ठ अधिकारी व अभियंते.

# अकोला येथे कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण



**अकोला :** प्रशिक्षणात माहिती घेताना कर्मचारी.

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

अमरावती परिमंडळाअंतर्गत ज्ञानप्रकाश प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे विविध प्रशिक्षण घेण्यात आले.


यामध्ये 'प्रशिक्षण आपल्या दारी' अंतर्गत २२० के.व्ही. उपकेंद्र पारस, मालेगाव, विहीगाव, १३२ के.व्ही. मेहकर, दुसरबिड, अमरावती, आर्णी येथील कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक उपकेंद्रामध्ये एकदिवसीय Know your sub station अंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी अधिक्षक अभियंता चाचणी व दूरसंचार मंडळ अकोला तथा प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख श्री. रूपेश फरकाडे, कार्यकारी अभियंता श्री. पुरुषोत्तम लाजूरकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. नितीन कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षण केंद्राच्या समन्वयिका सौ. चारुलता काळे यांनी प्रशिक्षणाचे व्यवस्थापन केले.



## *सांघिक सामाजिक उत्तरदायित्व*

*रेल्वे मेन्स विद्यालय अजनी, नागपूर येथे संगणक कक्षाची उभारणी.*



# Multiplying Leadership




नेतृत्वगुण हा अतिशय दुर्मिळ गुण आहे. कंपनी, संघटना आणि समाजामध्ये त्याला अतिशय महत्त्व आहे. कारण नेतृत्वावरच ती संघटना, कंपनी किंवा समाजाची प्रतिमा तयार होत असते. त्याला नेतृत्वाचा पगडा असेही म्हणता येईल. आस्थापनातील निर्णय हे सामूहिक असले पाहिजेत; पण त्यांचा कल हा नेतृत्वच ठरवत असतो. त्यामुळे नेतृत्व किती दूरदर्शी आहे, किती धोरणी आहे, यावर त्या कंपनीचे यश अवलंबून असते.

याचा अर्थ असा नाही की, नेतृत्व म्हणजे एक व्यक्ती. नेतृत्व याचा अर्थ नेतृत्वाची शृंखला तयार करणे. ती आस्थापनात जाणीवपूर्वक निर्माण करावी लागते. एवढ्या मोठ्या आस्थापनातील दैनंदिन सर्व निर्णय कोणी एक व्यक्ती किंवा वरिष्ठ घेऊ शकत नसतात. ते व्यवहार्यही नसते. त्यांच्याखाली नेतृत्वाची एक साखळी तयार झाली असेल तर त्या आस्थापनाचे दैनंदिन कामकाज विनाअडथळा चालू राहते. जेथे नेहमीची दिशा बदलण्याचा विषय असतो, तेथे या नेतृत्वाच्या साखळीची जबाबदारी वाढते. कारण ते निर्णय अधिक महत्त्वाचे असतात, ज्यामुळे आस्थापनाचा पुढील प्रवास निश्चित होणार असतो.

नेतृत्वगुण ही आपल्या आयुष्यातही अतिशय महत्त्वाची बाब आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी नेतृत्वगुण असणे अत्यंत आवश्यक असते. नेतृत्वाची खरी कसोटी असते, ती म्हणजे अडीअडचणीच्या वेळी निर्णय किती वेगाने आणि किती विचार करून घेतला गेला आहे. आपल्यासारखे अनेक अधिकारी व कर्मचारी जेथे काम करतात, तेथे अशा वेगाने आणि विचारपूर्वक निर्णय घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची तुकडीच असावी लागते. त्यासाठी जे चांगले काम करतात, नवनवी जबाबदारी घेतात, त्यांना हेरून त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणे, त्यांना अधिक वेळ देणे आणि त्यांना तेवढे अधिकारही देणे, हे महत्त्वाचे असते.

टीमवर्कविषयी आपण अनेकदा जाणून घेतले आहे आणि त्याचे महत्त्व आपण जाणून घेतले आहे, ते तर नेहमीच आवश्यक असते, आणि त्याशिवाय कंपनी वाटचाल करू शकत नाही; पण या वाटचालीची दिशा हे नेतृत्वच ठरवत असते. त्यामुळे नेतृत्वाकडे जसे निर्णय घेण्याची क्षमता लागते, तसेच अनुभवाची शिदोरीही लागते. ती ज्याच्याकडे असते, तो त्या संस्थेची वाटचाल अधिक चांगली कशी होऊ शकेल, यासंबंधीचे निर्णय घेऊ शकतो. त्यामुळे नेतृत्वाच्या फळीत जे-जे समाविष्ट आहेत, ते सर्व आपल्या संस्थेच्या कामाविषयी अनुभवी असले पाहिजेत, हे ओघाने आलेच. पदावर काम करणाऱ्या व्यक्तीमध्ये प्रशासकीय कारणाने नेहमी बदल होत असतात; पण कंपनीचे काम हे दीर्घकालीन असते. अशावेळी अनुभवी नेतृत्वाची कसोटी लागते.

नेतृत्वाची आणखी एक जबाबदारी म्हणजे कंपनीचे ध्येय निश्चित करणे आणि त्या दिशेने कंपनीतील सर्व क्षमता कामाला लावणे. ही ध्येयनिश्चिती आपल्या सहकाऱ्यांपर्यंत पोचविण्यात नेतृत्व जेवढे यशस्वी होते, तेवढे ते ध्येय पुढे घेऊन जाण्यास संस्थेला मदत होते. हे ध्येय जेव्हा एका नेतृत्वापुरते मर्यादित राहत नाही, ते नेतृत्वाच्या गुणाकारात होते, तेव्हा संस्था वेगाने त्या ध्येयाच्या दिशेने मार्गक्रमण करू लागते. नेतृत्वाच्या गुणाकाराला यामुळे महत्त्व आहे.

ध्येय निश्चित करणे, संस्थेत शिस्तीकडे लक्ष ठेवणे, सांघिक भावना वाढीस लावणे आणि यासाठी नेतृत्वाचा गुणाकार करणे, ही जशी नेतृत्वाची जबाबदारी आहे, तशीच आणखी एक महत्त्वाची जबाबदारी आहे. ती म्हणजे चांगल्या केलेल्या कामासाठी शाबासकीची थाप देणे. असे केल्याने संस्थेच्या टीममध्ये काम करण्याची, निर्णय घेण्याची प्रेरणा कायम राहते. काही कामांची विशेषतः नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना ते तंत्रज्ञान शिकून घेण्यासाठी पुढाकाराची आणि धाडसाची गरज असते. असा पुढाकार आणि धाडस तेव्हाच निर्माण होते, जेव्हा नेतृत्व वडीलकीच्या भूमिकेत मागे उभे राहते. अशी भूमिका वठविणाऱ्या नेतृत्वाचा गुणाकार जेवढा मोठा आणि मजबूत, तेवढा त्या कंपनीच्या नव्या गोष्टी स्वीकारण्याचा वेग चांगला. चला, अशा नेतृत्वाची एक टीम उभी करून आपण आपल्या कंपनीला नव्या ध्येयप्राप्तीसाठी सज्ज करूयात.

**शुभेच्छांसह..!**

**- सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

**संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)**
E-mail : prohr@mahatransco.in
**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)**

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.